# मे. न्यायाधीश सहकारी न्यायालय, अहमदनगर यांचे न्यायालयात.

**(मा. श्री. बी. एस. लखोटे - न्यायाधीश यांचे समक्ष)**

**दावा क्रमांक ५१/२०२२**

वीज तांत्रिक कामगार सहकारी
पतसंस्था मर्या. शेवगांव **---- वादी**

***विरुध्द***

१) श्री. प्रवण दिलीप खांदवे व इतर **---- प्रतिवादी**

**<u>निशाणी-४८ वरील आदेश</u>**

१) प्रतिवादी क्र.१ यांनी अर्ज दाखल करुन मागणी केली आहे की, संस्थेने Peocit Software Solution Pvt. Ltd. Pune चे सॉप्टवेअरमध्ये कर्जदाराचा उतारा वापर करुन त्यामध्ये व्यवहार ठेवले आहेत तो खाते उतारा संस्थेने दाखल करावा. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे संस्थेकडे अशाप्रकारचा खाते उतारा उपलब्ध आहे परंतु दाखल केला नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याकडील प्रत निशाणी-४६ कडे दाखल केली आहे. अशा परिस्थितीत संस्थेच्यात ताब्यातील सॉप्टवेअरचा उतारा, प्रतिवादीचा खाते नंबर-१०/११६२ च्या नोंदी खातेउताऱ्यात नमुद आहेत. त्यामुळे तो खाते उतारा दाखल करणे आवश्यक आहे.

२) प्रतिवादी यांच्या अर्जाला उत्तर दाखल करुन वादीने कथन केले की, संस्थेने खरेदी केलेले या कंपनीचे सॉप्टवेअर आजही पूर्णपणे कार्यान्वित झाले नाही, त्यामुळे खाते उतारे संगणकीकृत स्वरुपात निघत नाहीत. प्रतिवादीने त्यांच्या मॅन्युअली तयार केलेला खाते उतारा दाखल केला आहे. संस्थेकडे संगणकीय खाते उतारा नाही.

३) प्रतिवादीने दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्दा निर्माण होतो की, संस्थेकडे वर नमुद केलेल्या कंपनीचे सॉप्टवेअरमध्ये खाते उतारा उपलब्ध आहे काय? वादीने सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द कर्ज रक्कम वसुलीकरिता दाखल केला असुन वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांनी संस्थेकडून रु.७,००,०००/- कर्ज घेतले. प्रतिवादी यांनी ही बाब मान्य केली, परंतु निवेदन केले की, त्यांनी संस्थेकडे सन २०२१ मध्ये संपूर्ण कर्ज रक्कमेचा भरणा केला आणि कर्ज खाते निल केले. वादीने त्यानंतर दाव्यामध्ये पुरावा दाखल केला आणि प्रतिवादीचे वकीलांनी उलटतपासणी घेतली. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी-४६ कडे तसेच वादी संस्थेने निशाणी-४३ कडे खाते उतारा दाखल केला. परंतु प्रतिवादी क्र.१ च्या म्हणण्याप्रमाणे संस्थेने Peocit Software Solution Pvt. Ltd. Pune या सॉप्टवेअरचा वापर करुन कर्जदाराचे खाते उतारे ठेवले आहेत आणि या प्रकरणामध्ये दाखल केले नाहीत. वादीने स्पष्टपणे ही बाब कथन केली की, अशाप्रकारचा सॉप्टवेअरमधील खाते उतारा पूर्णपणे कार्यान्वित झाला नाही त्यामुळे संस्थेकडे नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी अशाप्रकारचा खाते उतारा कोणत्या

कारणास्तव आवश्यक आहे हे नमुद केले नाही. दोन्ही पार्टींनी निशाणी-४६ आणि निशाणी-४३ कडे त्यांचा खाते उतारा दाखल केला. खाते उताऱ्यातील नोंदी ह्या बरोबर आहेत किंवा नाही त्याचे अवलोकन न्यायनिर्णय करतेवेळी करण्यात येईल. परंतु या क्षणी माझ्या मते संस्थेकडे अशाप्रकारच्या सॉप्टवेअरमध्ये खाते उतारा उपलब्ध नसल्यामुळे संस्थेला खाते उतारा दाखल करण्याकरिता निर्देशीत करता येत नाही. करिता खालील आदेश पारित करित आहे.

**आ दे श**

१) प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ : अहमदनगर
दिनांक : २१/०६/२०२३

**(बी.एस.लखोटे)**
**न्यायाधीश,**
**सहकार न्यायालय, अहमदनगर.**